**<u>नि.दि.दा.क्र. ३३५/२०११</u>**

विठ्ठल लबडे व इतर वि. राजाराम व इतर

**<u>नि.क्र.८७ लगत.</u>**

**वादींतर्फे साक्षीदार क्र.१**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | विठ्ठल राजाराम लबडे |
| वय | – | ४२ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणार | – | टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३, २० व २२ तर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

१३. माझी आई आणि वडीलांच्या लग्नाबद्दल मला माहिती नाही. माझ्या आई व

वडीलांचे लग्न कधी व कोठे झाले हे मला माहिती नाही. माझ्या वडीलांना ३ भाऊ आहेत. त्यांची नावे तुकाराम श्रीधर लबडे, नामदेव श्रीधर लबडे यांची नावे मला माहिती आहेत. बाभळगाव येथे माझ्या वडीलोपार्जित जमिनी होत्या व आहेत. हे खरे आहे की, माझा भाऊ दत्तात्रय हा माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठा आहे. हे खरे नाही की, माझ्या भावाचा जन्म होण्यापुर्वी दोन वर्षाअगोदर माझ्या आई व वडीलांचे लग्न झाले होते.

१४. हे खरे नाही की, सन १९७२ साली दुष्काळ पडल्यामुळे माझे वडील मोलमजुरीसाठी बाहेरगावी गेले. हे खरे नाही की, त्यांच्या मजुरीच्या पैशातून वडीलांनी ९१+९२/२ मधील ५३ आर, पोटखराबा ३ आर दि. १०/०८/१९७६ रोजी खरेदी घेतले. हे खरे आहे की, खरेदीखताआधारे फेरफार क्र. २६५८ प्रमाणे महसुल दफ्तरी नोंद झाली. हे खरे आहे की, सर्व्हे क्र. २१२ पैकी ४२ आर पो.ख.३७ आर मधील मिळकत दि. २६/१२/१९७४ रोजी राजाराम श्रीधर लबडे यांनी तुकाराम बयाजी वडवकर यांच्याकडून विकत घेतली. हे खरे आहे की, सर्व्हे क्र. १९८ पैकी ४१ आर मिळकत मारुती संभु वडवकर यांच्याकडून दि. २८/०१/१९८३ रोजी खरेदीखत दस्ताने विकत घेतली. या तिन्ही जमिनीचे खरेदीखत मी पाहिले आहे. ती खरेदीखते किती रकमेची व त्यावरील साक्षीदार कोण आहेत हे मला सांगता येणार नाही. त्या रकमा कशा दिल्या हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, माझ्या वडीलांनी सदर जमिनी मोलमजुरी करुन घेतल्या असल्यामुळे मला ते सांगता येत नाही. या जमिनी खरेदी केल्या त्यावेळेस माझा जन्म झाला नव्हता. हे खरे नाही की, माझ्या आईने दाखल केलेल्या पोटगीच्या दाव्यात माझा भाऊ व आईला कोर्टाने पोटगी दिली होती. हे खरे आहे की, माझ्या वडीलांनी पोटगी भरली नाही म्हणुन ते विसापुर जेलमध्ये होते. हे खरे आहे की, माझ्या वडीलांकडे पैसे भरायला नसल्यामुळे ते जेलमध्ये होते. हे खरे नाही की, वडीलांचा जेलचा कालावधी झाल्यानंतर आम्ही व वडील एकत्र आलो नाहीत. हे खरे नाही की, माझे वडील माझ्या जन्माच्या पुर्वीपासुन आमच्यापासुन वेगळे राहतात.

१५. हे खरे आहे की, सद्या माझी आई व मी एकत्र राहतोत. हे खरे नाही की, माझा भाऊ व वडील हे वेगवेगळे राहतात. हे खरे नाही की, माझ्या वडीलांनी जमिनी

घेतल्या व ते वयस्कर झाल्यामुळे औषधोपचार करण्यासाठी त्यांच्यावर कर्ज झाले आहे. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ला झालेल्या खर्चामुळे व कर्जामुळे त्याने सर्व्हे क्र. २१२ पैकी ४२ आर पो.ख.३७ आर व सर्व्हे क्र. ९१/९२/२ मधील ५३ आर पो.ख. ३ आर असे क्षेत्र प्रतिवादी क्र. २२ जालिंदर लाढाणे यांना रक्कम रुपये ८,२५,०००/– ला विकले आहे. हे खरे नाही की, त्याप्रमाणे माझ्या वडीलांनी सदर जमिनी प्रतिवादी क्र. २२ च्या ताब्यात दिल्या. हे खरे आहे की, सदर मिळकतीमध्ये प्रत्यक्ष माझा जाबा नाही. हे खरे नाही की, माझ्या वडीलांनी वरील मिळकती स्वकष्टार्जित खरेदीखताने विकत घेतल्या होत्या व त्यांनी त्या विकल्या. हे खरे नाही की, सदर जमिनी विकत घेण्यासाठी माझ्या वडीलांनी एकत्र कुटूंबाचा कोणताही आधार घेतला नाही. हे खरे नाही की, प्रतिवादी जालिंदर लाढाणे यांच्या हक्कात करुन दिलेले खरेदीखत रद्द करुन मागण्याचा मला अधिकार नाही. हे खरे नाही की, जमिनी वडीलांच्या स्वकष्टार्जित असल्याने त्यामध्ये मला वाटप मागण्याचा अधिकार नाही. माझ्या पत्नीचे नाव राणी विठ्ठल लबडे आहे. हे खरे आहे की, माझ्या पत्नीच्या नावावर सर्व्हे क्र. १९८ मधील काही क्षेत्र आहे. ते क्षेत्र आम्ही मैनाबाई कडून विकत घेतले आहे. मैनाबाई ही माझी आई आहे. सदर मिळकत या दाव्यात सामाविष्ट नाही. हे खरे आहे की, माझ्या नावावर जोगेश्वरवाडी, ता. कर्जत येथे प्लॉट क्र. १६५/१/२० हा आहे. हे खरे आहे की, सदर प्लॉट या दाव्यात सामाविष्ट केला नाही. हे खरे आहे की, सर्व्हे क्र. १३१/२ मध्ये प्रसाद गौतम पवार व माझ्या नावावर १० आर क्षेत्र आहे. हे खरे आहे की, त्या क्षेत्रामध्ये बांधकाम करुन भाड्याने मी विनोद पवार याला दिलेल्या आहेत. हे खरे आहे की, त्या जागेत विनोद पवार याची डेअरी आहे. सदर मिळकत दाव्यात सामाविष्ट नाही.

१६. हे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २० ने १ हे. ७१ पैकी लक्ष्मण उत्तम लाढाणे, शिवाजी उत्तम लाढाणे, केशव छबु लबडे, सविता बाबा ढवळे व उत्तम रामभाऊ लाढाणे यांचा संपुर्ण हिस्सा विकत घेतला. हे खरे आहे की, माझ्या पत्नीच्या नावे मी १ हे. ७१ आर पैकी पाचवा हिस्सा विकत घेतला आहे. हे खरे आहे की, सदर हिस्सा मी माझ्या आईकडून विकत घेतलेला आहे. दावा दाखल केल्यानंतर किरणच्या नावावर हिस्सा घेतलेला आहे. हे खरे आहे की, किरण याचे नावे गट क्र. १३२/१, गट क्र.२१४

या गटाचे देखील त्याच दिवशी खरेदीखत झालेले आहे. हे खरे आहे की, सदर मिळकती किरणने किती रकमेला घेतले हे मला सांगता येणार नाही. मी खरेदीच्या वेळेस हजर नव्हतो. त्या व्यवहाराला मी डिकसळ येथे हजर होतो. तो व्यवहार ७,५०,०००/– मध्ये झालेला आहे. खरेदीची रक्कम काही रोख व काही धनादेशाद्वारे दिलेली आहे. धनादेश महाराष्ट्र बँकेचा होता. धनादेश किती रकमेचा होता हे मला सांगता येत नाही. हे खरे नाही की, त्या जमिनीचा व माझा कोणताही संबंध नसल्यामुळे कती रकमेचा धनादेश होता इत्यादी बाबी मला सांगता येत नाही. लक्ष्मण उत्तम लाडाण, शिवाजी उत्तम लाढाणे, केशर लाढाणे, सविता ढवळे व उत्तम लाढाणे यांना मी साक्षीदार म्हणुन तपासणार नाही. त्यापैकी दोन मावसभाऊ, दोन मावसबहिणी व एक काका आहेत. दावा दाखल करण्याच्यापुर्वी ४–५ वर्षांपासुन आम्ही वेगळे होतो.

१७. हे खरे आहे की, वडीलासोबत आईचे कोर्ट मॅटर सुरु झाले त्यावेळेस मी, माझा भाऊ व आई एकत्र राहत होतो. हे खरे आहे की, माझा भाऊ इयत्ता १० वी शिकला आहे. हे खरे नाही की, त्याने अहमदनगर येथे आय.टी.आय.साठी ॲडमिशन घेतले. हे खरे आहे की, माझ्या भावाचा वेल्डींगचा कोर्स झाला आहे. हे खरे आहे की, तो श्री बेद्रे यांच्याकडे काही दिवस मजुर म्हणुन काम करीत होता. ४–५ वर्षापासुन माझ्या भावाने वेल्डींगचे दुकान टाकले आहे. माझ्या भावाने मिरजगाव, राशिन येथे काही दिवस काम केले. त्यानंतर त्याने माहिजळगाव येथे वेल्डींगचे दुकान टाकले. हे खरे नाही की, सर्व्हे क्र. २४१/१ मधील पैकी क्षेत्र ६० आर भागवान रामकृष्ण चांडे याच्याकडून दि. २८/०५/२००४ रोजी माझ्या भावाने विकत घेतले. हे खरे आहे की, माझ्या भावाची नोंद फेरफार क्र. ३५७१ ने लागलेली आहे. हे खरे नाही की, सर्व्हे क्र. ९१+९२/३ मधील क्षेत्र ३३ आर हे माझ्या भावाने सिताराम श्रीधर लबडे याच्याकडून विकत घेतले. हे खरे आहे की, खरेदीची नोंद ३७०२ ने फेरफारला लागली. ग्रामपंचायत मिळकत क्र. ३४२ चा दस्त मी दाखल केलेला नाही. तो दस्त मी पाहिलेला आहे. ती मिळकत श्री. ढोबे यांच्याकडून घेतलली आहे. सदर खरेदीखतात मिळकत नंबर काय होता हे मला सांगता येणार नाही. घरजागा मिळकत ३३८/३ दाव्यात सामाविष्ट नाही. ग्रामपंचायत क्र ३४२ चे खरेदीखत मी दाव्यात दाखल करणार आहे. माझ्या सांगण्याप्रमाणे सरतपासाचे

शपथपत्र दाखल केले आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते २२ यांची सर्व नावे मला क्रमाने सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या नावावर एकुण पाच ठिकाणी जागा आहेत. त्या जागा या दाव्यात सामाविष्ट केल्या नाहीत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्या जागा दावा चालु असताना घेतलेल्या आहेत. या जागा कधी घेतल्या हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादी किरण ने दि. १७/०८/२०२३ रोजी मिळकत घेतली. हे खरे नाही की, सदरची मिळकत १३,५५,०००/- रुपयेला विकत घेतली. किरण यांच्या नावे फेरफार क्र. ६४५२ मंजुर झालेला आहे. प्रतिवादी क्र. ३ च्या नावे असलेला फेरफारची नक्कल मी दाखल करु शकतो. हे खरे नाही की, माझा भाऊ दत्तात्रय व पुतण्या किरण याच्या नावे घेतलेल्या मिळकती या भावाने वेल्डींगच्या उत्पान्नातुन घेतलेल्या आहेत. हे खरे नाही की, त्या मिळकती त्यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. हे खरे नाही की, त्या मिळकतीत वाटप मागण्याचा मला अधिकार नाही. हे खरे नाही की, दावा मिळकती या श्रीधर लबडे याच्या मालकीच्या नाहीत. त्या मिळकती श्रीधर लबडेच्या मालकीच्या असल्याबद्दलचा दस्त मी अभिलेखावर दाखल केला नाही. श्रीधर लबडे याच्या मालकीच्या मिळकती असल्याबद्दलचा दस्त मी दाखल करु शकतो. श्रीधर लबडे यांच्या मालकीचे असल्याबद्दल त्यांच्या नावचे उतारे दावा मिळकत अ, ब, क, ड उतारे दाखल करणार आहे. मी माझ्या आईला साक्षीदार म्हणुन तपासणार आहे.

१८. हे खरे नाही की, माझ्या वडीलांनी प्रतिवादी क्र. १ यांना कर्ज झाल्यामुळे कर्ज फेरण्यासाठी त्यांनी मोलमजुरी करुन विकत घेतलेली मिळकत सर्व्हे क्र. २१२ मधील ४२ आर, पो.ख. ३७ आर व सर्व्हे क्र. ९१/९२/२ क्षेत्र ५३ आर, पो.ख. ३ आर अशी एकुण ५६ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. २२ जालिंदर लाढाणे यांना ८,२५,०००/- रुपयांना विकली. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २२ ने सदरची मिळकत विकत घेण्यापुर्वी प्रतिवादी क्र. १ च्या नावचे सर्व कागदपत्रे तपासुन खरेदीखत करुन घेतले. हे खरे नाही की, रुपये ८,२५,०००/- रुपयाच्या मावेजात प्रतिवादी क्र. २२ ने सदरची मिळकत विकत घेतली. खरेदीखताचा दस्त क्र. ६५५/२०२३ असा आहे. हे खरे नाही की, सदर खरेदीखताआधारे जालिंदर लाढाणे यांना माझ्या वडीलांनी ताबा दिला. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २२ हा कायदेशीर खरेदीखताआधारे ताबेदार

आहे. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २२ ने विकत घेतलेल्या जमिनीचा माझा काही संबंध नाही. बाभळगाव खालसा येथे श्रीधर लबडे यांच्या वडीलोपार्जित ७ ते ८ एकर जमिनी आहेत. त्याचे उतारे मी पाहिले नाहीत. हे खरे आहे की, त्या जमिनीचा या दाव्यात उल्लेख केलेला नाही.

**प्रश्नः** तुम्ही तुमच्या व तुमच्या पत्नीच्या नावच्या मिळकती दाव्यात सामाविष्ट केल्या नाहीत म्हणुन दाव्याला बाधा येते?

**उत्तरः** त्या मिळकती आम्ही सद्या विकत घेतलेल्या आहेत.

श्रीधर लबडे यांच्या वडीलोपार्जित मिळकतीचे कागदपत्रे मी माझ्या विधिज्ञांना दिले होते. माझे शपथपत्र मी वाचून पाहिले होते. एक महिन्यापुर्वी मी श्रीधर लबडे यांच्या मिळकीचे कागदपत्रे मी माझ्या विधिज्ञांना दिले होते. माझ्या शपथपत्रात बाभळगाव खालसा येथील जमिनीचा उल्लेख केलेला नाही. मी माझ्या वकीलांना या मिळकतीचा शपथपत्रात उल्लेख केला नाही असे बोललो होतो. त्या मिळकती शपथपत्रात घालण्यासाठी मी वकीलांना सांगितले होते. घरजागा मिळकतीबद्दलच्या दुय्यम निबंधकाचे मुल्यांकन मी घेतलेले नाही. हे खरे आहे की, घरजागा मिळकतीबद्दलचा कोर्ट फी स्टॅम्प मी भरलेला नाही. दावा कलम अ, ब, क मध्ये कोणत्या मिळकती वर्णन केल्या आहेत हे मला जसेच्या तसे सांगता येणार नाही. दाव कलम अ, ब, क, ड मधील मिळकतीचे क्षेत्र आणि चतुःसिमा मला सांगता येणार नाही.

१९. हे खरे नाही की, दावा मिळकत अ, ब, क, ड मधील मिळकती वडीलोपार्जित असल्याचे मी खोटे सांगितले आहे. हे खरे नाही की, माझ्या वडीलांनी मोजमजुरी करुन कारखान्यावर काम करुन दाव्यातील मिळकती स्वतः कमावलेल्या आहेत. हे खरे नाही की, दत्तात्रय याने वेल्डींगच्या व्यवसायातून मिळालेल्या पैशातून त्याच्या व त्याच्या मुलाच्या नावावर मिळकती घेतलेल्या आहेत. हे खरे नाही की, माझे वडील व भाऊ, पुतण्या यांनी त्यांच्या नावावरील मिळकती विकत घेण्यासाठी एकत्र कुटूंबाचा आधार घेतला नाही. हे खरे नाही की, माझ्या जन्मापासुन आमचे एकत्र कुटूंब होते. हे खरे नाही की, माझ्या आई व वडीलांचे कधीही जमले नाही. माझ्या आई व वडीलांचे लग्न १९७७ साली झाले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही

की, माझ्या आई व वडीलांचे लग्न होण्यापुर्वीच माझ्या वडीलांनी जमिनी विकत घेतलेल्या आहेत. हे खरे नाही की, माझे आई व वडीलांचे जमत नसल्यामुळे माझा भाऊ शिक्षणासाठी बाहेर गेला ते परत कधीही परत आला नाही. हे खरे नाही की, माझा भाऊ आमच्यासोबत कधीही एकत्र राहिला नाही. हे खरे नाही की, माझ्या भावाने मोलमजुरी करुन आयटीआयचा कोर्स केला. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १, २ व २० यांच्या स्वकष्टार्जित मिळकती असल्याने मला वाटप मागण्याचा अधिकार नाही. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२२ ने मिळकत स्वकष्टाने विकत घेतल्यामुळे मला वाटप मागता येणार नाही. हे खरे नाही की, मी खोट्या मजकुराचा दावा दाखल केला आहे. मी सन २०११ पुर्वी वाटप मागितले. हे खरे नाही की, वाटप मागण्यासाठी कोणतेही कारण घडले नाही. हे खरे नाही की, वादमिळकतीत माझा कोणताही हक्क अधिकार नाही. हे खरे नाही की, मी खोटया मजकुराचा दावा दाखल करुन खोटे शपथपत्र दाखल केले. हे खरे नाही की, माझ्या भावाने व वडीलांनी विकत घेतलेल्या जमिनी मिळवण्यासाठी मी खोटा दावा दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.02.23 17:45:29 +0530

(आर. बी. राऊत)

दि.२३/०२/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर